गुरु विश्वंभर कृपा बहुउदेशीय शिक्षण प्रसारक मंडळ,लक्कडजवळगा द्वारा संचलित

# शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ जि.लातुर

राष्ट्रीय सेवा योजना (National Service Scheme)
विशेष शिबीर कार्यक्रम सन 2018 -2019
मौजे सांगवी(घुग्गी) ता. शिरुर अनंतपाळजि.लातुर

राष्ट्रीय सेवा योजनेचे घोषवाक्य माझ्यासाठी नसुन तुमच्यासाठी (Not me But You ) सार्थक करण्याचा प्रमाणिक प्रयत्न आमच्या शिवनेरी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडुन केले जात आहे या प्रयत्नांना महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकाचा उत्सफुर्त व प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. याचा प्रत्यय वेळोवेळी नियमित कार्यक्रमातुन दिसून आला आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने या वर्षी शैक्षणिक वर्ष 2018 -2019 वर्ष 14 वे विशेष शिबीर घेण्यात आले.हे सात दिवसीय शिबीर "पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपतीच्या संवर्धनासाठी युवक व स्वच्छ व स्वस्थ भारत अभियानासाठी" मौजे सांगवी घुग्गी ता. शिरुर अनंतपाळ जि.लातुर येथे दिनांक 21/01/2019 ते दिनांक 27/01/2019 या कालावधीत घेण्यात आले. या शिबीरात सहभागी झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवाकांनी बांधिलकीच्या भावनेतुन श्रमदान केले .तसेच जनजागृती अभियानात सहभागी होऊन राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय व उदिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.

शिबीराच्या 7 दिवसाच्या कालावधीत शिबीरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ग्रामस्वछतेवर भर देताना वृक्षारोपन तसेच पर्यावरण संतुलन इत्यादी गोष्टीसाठी श्रमदान केले. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी ग्रामस्थांना ग्रामस्वच्छतेचे महत्व कृतीतुन दाखवत सर्व सावर्जनीक परिसर खराटा हातात घेऊन झाडुन स्वच्छ केला. तसेच तुबलेल्या गटारी साचलेला गाळ गटारीतुन बाहेर काढून घाण पाण्याला वाट मोकळी करुन दिली. ज्यामुळे रोगराई व डासांचा प्रमाण वाढत होते. या स्वच्छतेमुळे ते कमी होण्यास मदत झाली. गावात ग्रामस्थांना शौचालयाचे महत्व पटवून देऊन त्यांना शौचालय उभारण्यास प्रवृत केले. त्यासाठी. रा.से. यो. च्या विद्यार्थ्यानी शौचालयाचे खड्डे पाडुन दिले. गावातील सर्व घाण व एकमेकांच्या मनातील द्वेष स्वच्छ करण्यासाठी संत गाडगेबाबा चा खराटा घेऊन आमच्या स्वयंसेवकांनी काम केले. आमच्या

महाविद्यालयातील रा.से.यो. स्वयंसेवकांनी घर घरात जाऊन सर्व नागरीकांना वैयक्तीक स्वच्छता ,घराची स्वच्छता व शौचालयाचे महत्व सांगण्याचा प्रयत्न केला.

मौजे सांगवी घुग्गी येथे विशेष शिबीर घेण्यासाठी रा.से.यो. समन्वयक स्वा.रा.ती .म.विध्यापीठ .नांदेड यांनी परवानगी दिल्याबदल त्यांचे आभार व संस्थेचे अध्यक्ष अड . विश्वंभररावजी माने साहेब यांनी शिबीर घेण्यासाठी परवानगी दिल्याबदल त्यांचे आभार व तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.ए. एन.पवार मौजे सांगवीचे सरपंच बालाजी निव्रती कांबळे उपसरपंच श्री. अरुण घुग्गे, सतीश पाटील,मंगल बिराजदार, ग्रामसेवक माडीबोने काळू सर इत्यादींनी आमच्या 7दिवसाच्या शिबीरास सहकार्य केल्याबदल त्यांचेही आभार.

1. दिनांक 21/01/2019

रोजी रा.से.यो. विद्यार्थ्यांनी मौजे सांगवी घुग्गी गावाकडे प्रस्ताव करुन निवास ठिकाणाची व जवळची साफसफाई केली. मौजे सांगवी गावातुन पर्यावरण संवर्धनासाठी तसेच स्वचछतेचे महत्व पटावे म्हणुन रा.से. यो. स्वयंसेवकांनी एक रॅली काढली. रॅलीच्या माध्यमातुन वातावरण निर्मीती करण्याबरोबरच जनजागृती करण्यात आली. जि.प. शाळेचा परिसर स्व्यंकसेवकांनी स्वच्छ केला. तसेच त्यादिवशी शाळेत घणकचरा खडा मारण्यात आला. स्व्यंसेवकांचे गट पाडले. एकंदरीत शिबीराच्या पहिल्याच दिवशी गावात वातावरण निर्मीती करण्यात आली. त्यामुळे पुढील सहा दिवस लोकांचा उत्सर्फुत प्रतिसाद मिळाला.

2. दिनांक 22/01/2019

रोजी सकाळी ठिक 6.30 वा योगासने व प्राणायम घेण्यात आला. त्यात कांही गावकरी व तरुण मुले मुली आमच्या स्वयंसेवकावरोवर सहभागी झाले. सकाळी ठिक 10.00 वाजता शिबीराचे रितसर उदघाटन झाले. या उदघाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. सुतेज प्रतापराव माने होते.उदघाटक मा.श्री.रा.से.यो.जिल्हा समन्वयक डॉ.संतोष पाटील यांनी उदघाटन केले. प्रमुख पाहुणे मा.श्री. शेरखाने साहेब गटविकास अधिकारी,बालाजी पोतदार गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती शिरूर अनंतपाळ प्राचार्य .डॉ.ए.एन.पवार मा.श्री.पदमाकर मोगरगे हे सर्व उपस्थित होते दुपारी ठिक 2 वाजता व्यसन मुक्ती. दहशतवाद, बचतगट,संत साहित्यातील समाज प्रबोधन या विषयावर प्रा.जाधव ओ.डब्लू, डॉ.धुमाळे डी.के, डॉ.सोमवशी एम.वय, प्रा.रोडगे जी.एस. यांनी सविसृतर मार्गदर्शन करुन व्यसनमुक्ती ही काळाजी गरज आहे यावर प्रकाश टाकला.सायंकाळी 7 वाजता संत कबीर की वाणी,समाज आणी संस्कृती,पर्यावरण संवर्धन, या विषयावर विजय जागले,डॉ.एन.बी.सूर्यवंशी, प्रा.डॉ. मुठे पी.आर, इंगळे ए.आर,यांनी या विषयावर मार्गदर्शन केले.

3 . दिनांक 23 /01/2019

सकाळी ठिक 09 वाजता शिबिरातील विद्यार्थीनी गावातील रस्ते व नाले यांची साफसफाई करुन श्रमदान केले. दुपारी 2 वाजता पंचायत राजव्यवस्था,पर्यावरणीय आपत्ती,सद्रढ आरोग्यासाठी खेळ, भ्रष्टाचार या विषयावर प्रा.शेख एस.एल, डॉ.वागलगावे एच.डी, कांबळे एस.एन, प्रा.हालसे बी.पी.यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच रात्री ठीक 7 वाजता ग्रंथाचे महत्व, भ्रष्टाचार निर्मुलन, राष्ट्रीय एकात्मता. या विषयावर प्रा.सूर्यवंशी के.ए, प्रा.शिंदे पी.आर, प्रा.डॉ.जाधव डी.बी.यांनी रा.से.यो. स्वयंसेवक व गावक-यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

4. दिनांक 24/01/2019

रोजी सकाळी ठिक 6.30 वा योगासने व प्राणायम घेण्यात आला. त्यात कांही गावकरी व तरुण मुले मुली आमच्या स्वयंसेवकाबरोबर सहभागी झाले. सकाळी ठिक 09 वाजता शिबिरातील विद्यार्थीनी गावातील रस्ते व नाले यांची साफसफाई करुन श्रमदान केले. दुपारी 2 वाजता साहित्य व समाज प्रबोधन,दैनंदिन जीवनातील रसायनशास्त्र,पर्यावरण संवर्धन या विषयावर प्रा.गायकवाड एम.जी,प्रा.बोंडगे अभय डॉ.मुंढे व्ही.के. यांनी विद्यार्थीना मार्गदर्शन केले. तसेच रात्री 7 वाजता मत्स्य व्यवसाय,विज्ञान तंत्रज्ञान,देशाची कररचना या विषयावर डॉ.आर.आर जाधव डॉ.मानेएस.व्ही. प्रा.माने एस.वाय.यांनी विद्यार्थी व गावक-यांना मार्गदर्शन केले.

5. दिनांक 25/01/2019

सकाळी ठिक 8 वाजता विद्यार्थ्यांनी गावातील लोकांना घरी भेटी देऊन नेत्र तपासणी शिबिराचे महत्व सांगून गावातील नागरिकांचा सहभाग वाढवला.यावेळी लायन्स नेत्र रुग्णालय उदगीर चे डॉ.व त्यांची टीम यांनी गावातील नागरिकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.त्यामध्ये 145 रुग्णांची तपासणी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी गावातील परिसर स्वच्छ करून वृक्षरोपन केले. दुपारी 2 वाजता लघु उद्योगातून ग्रामीण विकास,देशी गायीचे संगोपन,जलसंधारण,नैसर्गीक ऊर्जास्त्रोत. या विषयावर डॉ.कुंडलवार एस.एल, प्रा.लुटे व्ही.व्ही, प्रा.जाधव आर.एन, प्रा.गौंड एन.एस, यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच रात्री 8 वाजता गणितातल्या गमती, वृक्षाचे संगोपन या विषयावर प्रा.वाकडे एम.डी, प्रा.वडनेरे एस.एम, डॉ.रायभोळे यु.के.यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

6. दिनांक 26/01/2019

सकाळी 07 वाजता प्रजासत्ताक दिनानिमित्त गावात प्रभात फेरी काढण्यात आली यावेळी स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.यावेळी सरपंच बालाजी कांबळे,जि.प.प्रा.शाळेचे मुख्याध्यापक काळू सर.रा.से.यो.चे.कार्यक्रमअधिकारी,विध्यार्थी,विध्यार्थिनी गावातील नागरिक उपस्थित होते. दुपारी 2 वाजता

राष्ट्रीय एकात्मता,दुध संकलन व व्यवस्थापन,पर्यावरण संवर्धन. या विषयावर प्रा.अंधारे.आर.एन,प्रा.खरोबे व्ही.बी,डॉ.लाटे ए.एम,प्रा.कुरे के.व्ही.यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रात्री 7 वाजता एड्स निर्मुलन, आयुर्वेदाचे महत्व.वनौषधीचे महत्व,व्यसनमुक्ती या विषयावर प्रा.कुमदाळे पी.जी.प्रा.शिंदे के.यु. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

7. दिनांक 27/01/2019

सकाळी ठिक 8 वाजता शिबीरातील विद्यार्थ्यांनी पशुरोग निदान शिबीरासाठी गावात माहिती दिली सर्व पशु जि.प.शाळेत जमा करण्याचे सांगितले यावेळी डॉ.शेख जी.जी. व त्यांची टीम यांनी 289 पशूची तपासणी केली सकाळी ठिक 11 वाजता प्रा.देवदत्त मुंडे यांनी फळे या काव्यसंग्रहाचे काव्यवाचन केले. पाणी अडवा पाणी जिरवा या विषयावर प्रा. शिंदे पी. आर डॉ.वागलगावे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.दुपारी 01 वाजता शिवीराचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री.प्रतापराव माने प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.ए. एन.पवार विजय पाटील उपस्थित होते तसेच प्रमुख उपस्थिती ,प्रा.गोरोबा रोडगे डॉ.वागलगावे डॉ.धुमाळे डी.के प्रा.जाधव ओ. डब्लू यांची उपस्थिती होती . या प्रसंगी सर्व प्राध्यापक व इतर कर्मचारी व गावकरी मोठया संख्येने उपस्थित होते

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
शिवनेरी महाविद्यालय,
शिरुर अनंतपाळ जि. लातूर

PRINCIPAL
Shivneri Mahavidyalaya
(Arts, Commerce & Science)
Shirur Anantpal * 413544
Dist. Latur (M.S.)

## : आपले विनीत :

प्रा. गोरोबा रोडगे
कार्यक्रमअधिकारी, रा.से.यो.,
शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ

प्रा.डॉ. हणमंत वागलगावे
कार्यक्रमाधिकारी, रा.से.यो.,
शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ

डॉ. घुमाळे डी.के. (अध्यक्ष सल्लागार समिती सदस्य) प्रा. हालसे बी.पी. (सल्लागार समिती सदस्य) प्रा.जाधव डी.बी. (सल्लागार समिती सदस्य) प्रा. अंधारे आर.ए. (सल्लागार समिती सदस्य)

प्रा. शिंदे के.यु. (सल्लागार समिती सदस्य) श्री.विजय जागले (मुख्य लिपीक) श्री.बाळासाहेब पाटील (शिंदे) (वरिष्ठ लिपीक) श्रीमती जाधव एस.टी (कनिष्ठ लिपीक)

श्री.संदीप पाटील (शिंदे), प्रा. भेंडेकर एस.एस.,प्रा. कांबळे डी.डी., प्रा. शेख बी.एस., प्रा. जोगदंड एस.एन., प्रा.जोशी जी.डी., डॉ. माने डी.व्ही., प्रा. मठपती एस.एस., प्रा. बुबणे डी. एल., प्रा. राघो पी.एस., प्रा. सुर्यवंशी बी.व्ही., प्रा. अनिकेत गळवे, श्री काळू यु.एम.,श्रीमती कोटलवार व्ही.डी., श्री. कुंभार व्ही.बी., श्री.लिंबापुरे बी.डब्ल्यु, श्री. नागटिळक एस.एल.,श्री जगताप डी.एच., श्री. कुंभार एस.व्ही, श्री. सुर्यवंशी एस.एच., श्री. तांबोळी एफ. एम., श्री.गायकवाड एल.एन.,

सन्माननीय ग्रा. पं. सदस्य व समस्त गावकरी, सांगवी (घु.).

### -: दिनचर्या :-

| | |
|---|---|
| स. ५.३० ते ७.३० योगासने व प्राणायाम | स. ८.०० ते ९.०० अल्पोपहार |
| स. ९.०० ते १२.०० श्रमदान | दु. १२ ते २ भोजन व विश्रांती |
| दु. २.०० ते ५.०० बौध्दिक कार्यक्रम | सायं. ५ ते ६.०० खेळ |
| सायं. ६ ते ७ सहभोजन | .रात्री. ८ ते १० सांस्कृतीक कार्यक्रम व व्याख्यान |

### -: शिबीरातील प्रकल्प :-

हागणदारी मुक्त गाव, ग्रामस्वच्छता, वृक्षारोपन, शेतकरी मेळावा, महिला मेळावा, सर्व रोग निदान शिबीर, रक्तदान शिबीर, एडस् जनजागरण,स्त्रीभ्रूण हत्या, मानसिक व भावनिक आरोग्य, पौगंडावस्थेतील समस्या, अंधश्रध्दा निर्मुलन, पर्यावरण संतुलन, नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन, जलसंधारण, विद्युत बचत, सांस्कृतिक व बौध्दिक कार्यक्रम इत्यादी

### -: संभाव्य भेटी :-

मा.डॉ. उद्धव भोसले (कुलगुरू स्वा.रा.ति.म.वि., नांदेड)

अतुल साळूंके (राज्यसंपर्क अधिकारी)

मा. शालीग्राम सर (समन्वयक, रा.से.यो.)

मा.प्रा.डॉ. पवार डी.डी. (रा.से.यो. समन्वयक, स्वा.रा.ति.म.वि. नांदेड)

मा.प्रा.डॉ. संतोष पाटील (जिल्हा समन्वयक, रा.से.यो.)

मा.प्रा.डॉ. दशरथ भिसे (वि... रा.से... स्वा.रा.ति.म.वि., नां...)

...लातूर/२५१५५४

# शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ

ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर.

राष्ट्रीय सेवा योजना

*Not Me* *But You*

NATIONAL SERVICE SCHEME

## : निमंत्रण पत्रिका :

# राष्ट्रीय सेवा योजना

''पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धनासाठी युवक व स्वच्छ व स्वस्थ भारत अभियानासाठी''

## विशेष युवक शिबीर

स्थळ :- मौजे सांगवी (घुग्गी) ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर.

कालावधी - २१ जानेवारी २०१९ ते २७ जानेवारी २०१९

बुक-पोष्ट

प्रति,
श्री/श्रीमती, ____________

: प्रेषक :
**प्राचार्य, डॉ. पवार ए.एन.**
शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ, जि. लातूर.

नोट : सांगवी (घुग्गी) हे ... व ... कि.मी. अंतरावर आहे.

महोदय,

आमच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर मौ. सांगवी (घुग्गी) ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे दि. २१-०१-२०१९ ते दि. २७-०१-२०१९ या कालावधीत मा. अँड. विश्वंभररावजी माने साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व विशेष उपस्थितीत संपन्न होत आहे.

तरी सर्व कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

## : उद्घाटन समारंभ :

मंगळवार दि. २२-०१-२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता.

अध्यक्ष :- मा.अँड. श्री. सुतेज प्रतापराव माने साहेब
(सदस्य, गुरु विश्वंभर कृपा बहुउद्देशीय शि.प्र. मंडळ, लक्कडजवळगा)

उद्घाटक :- मा.श्री. प्रा. डॉ. संतोष पाटील
(जिल्हा समन्वयक, रा.से.यो., स्वा.रा.ति.म.वि. नांदेड)

प्रमुख पाहुणे :- मा.श्री. शेरखाने साहेब (गट विकास अधिकारी, शि.अनंतपाळ)
मा.श्री. बालाजी पोतदार (गट शिक्षण अधिकारी, शि.अनंतपाळ)
मा.जयेश विश्वंभरराव माने साहेब
(सभापती - कृषी उत्पन्न बाजार समिती, शिरूर अनंतपाळ)
मा.श्री. पद्माकर मोगरगे साहेब
(सचिव, गुरु विश्वंभर कृपा बहुउद्देशीय शि.प्र. मंडळ, लक्कडजवळगा)
मा.डॉ. पवार ए.एन. (प्राचार्य, शिवनेरी महाविद्यालय शिरूर अनंतपाळ)

## -: प्रमुख उपस्थिती :-

| | | |
|---|---|---|
| श्री. बालाजी निवृत्ती कांबळे (सदस्य, सांगवी (घु.)) | श्री. अरूण विलास घुगे (उपसरपंच, सांगवी (घु.)) | श्री सतिष चंद्रप्रकाश पाटील (सदस्य, ग्रा.पं. सांगवी (घु.)) |
| सौ. मंगल सुभाष बिराजदार (सदस्य, ग्रा.पं. सांगवी (घु.)) | श्री. नामदेव ज्योतीराम हजारे (अध्यक्ष, तंटामुक्ती) | श्री. सचिन बालाजी पाटील (माजी अध्यक्ष, तंटामुक्ती) |
| सौ. श्रीकला रमेश शेंदकर (सदस्य, ग्रा.पं. सांगवी (घु.)) | श्री. माडीबोने डी.जी. (ग्रामसेवक, ग्रा.पं. सांगवी (घु.)) | सौ. सुमित्रा तानाजी कांबळे (सदस्य, ग्रा.पं. सांगवी (घु.)) |

सौ. मनिषा अशोक राठोड (सदस्य, ग्रा.पं. सांगवी (घु.))   शमशोद्दीन शेख (ग्रा.पं. कर्मचारी सांगवी (घु.))

## -: समारोप समारंभ :-

रविवार दि. २७-०१-२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता

| : अध्यक्ष : | : प्रमुख पाहुणे : |
|---|---|
| मा.डॉ. पवार ए.एन. (प्राचार्य, शिवनेरी महाविद्यालय शिरूर अनंतपाळ) | मा.श्री. प्रतापराव विश्वंभरराव माने साहेब (सहसचिव, गुरु विश्वंभर कृपा बहुउद्देशीय शि.प्र. मंडळ, लक्कडजवळगा) |

: प्रमुख उपस्थिती :

डॉ.एन.बी. सुर्यवंशी (इंग्लिश विभाग प्रमुख) डॉ.डी.के. घुमाळे (सल्लागार समिती) प्रा. गोरोबा रोडगे (रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी) डॉ. हणमंत वागलगावे (रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी)

## : कार्यक्रम पत्रिका :

| वार व दिनांक | वेळ | कार्यक्रम व विषय | सहभाग |
|---|---|---|---|
| दि.२१-०१-१९ सोमवार | दु. २ वा.<br>सायं.५ वा.<br>सायं.७ वा. | मौजे सांगवी (घुग्गी) गावाकडे प्रस्थान<br>स्वयंसेवकांचे गट पाडणे<br>गावकऱ्यांशी हितगुज | श्री. रोडगे जी.एस., डॉ. वागलगावे एच.डी., |
| दि.२२-०१-१९ मंगळवार | स.९ वा.<br>स.११ वा.<br>दु. २ वा.<br>सायं.७ वा. | श्रमदान<br>उद्घाटन समारंभ<br>व्याख्यान : व्यसनमुक्ती. दहशतवाद. नक्षलवाद. संत साहित्यातील समाज प्रबोधन. संत कबीर की वाणी. समाज आणि संस्कृती. पर्यावरण संवर्धन | डॉ. जाधव ओ.डब्ल्यू., डॉ. घुमाळे डी. के., डॉ. सोमवंशी एस.वाय., प्रा. रोडगे जी.एस. प्रा. इंगळे ए. आर., डॉ. मुंढे पी.आर., डॉ. सुर्यवंशी एन.बी., जागते विजय |
| दि.२३-०१-१९ बुधवार | स.७ वा.<br>स.९ वा.<br>दु. २ वा.<br>रा.७ वा. | श्रमदान<br>व्याख्यान: पंचायत राजव्यवस्था. पर्यावरणीय आपत्ती. सुदृढ आरोग्यसाठी खेळ. प्रंथाचे महत्व. भ्रष्टाचार निर्मुलन. राष्ट्रीय एकात्मकता. | प्रा. शेख एस.एल., डॉ. वागलगावे एच.डी. प्रा.कांबळे एस.एन. प्रा. हलसे बी.पी., प्रा. सुर्यवंशी के.ए., प्रा. शिंदे पी.आर., डॉ. डी.बी. जाधव, |
| दि.२४-०१-१९ गुरुवार | स.९ वा.<br>दु.२ वा.<br>रा.७ वा. | व्याख्यान: साहित्य व समाज प्रबोधन. दैनंदिन जीवनातील रसायनशास्त्र. पर्यावरण संवर्धन. मत्स्य व्यवसाय. विज्ञान तंत्रज्ञान. देशाची कल्पना. | प्रा. एस.जी. गायकवाड, प्रा. बोंडगे ए.एस., डॉ. मुळे व्ही.के., डॉ.जाधव आर.आर., प्रा. माने एस वाय, डॉ. माने एस.व्ही., |
| दि.२५-०१-१९ शुक्रवार | स.९ वा.<br>दु.२ वा.<br>रा.८ वा. | नेत्र तपासणी शिबीर<br>व्याख्यान : लघु उद्योगातून ग्रामीण विकास. देशी गायीचे संगोपन. जलसंधारण. नैसर्गिक ऊर्जास्त्रोत. गणितातल्या गमती. वृक्षांचे संगोपन. | डॉ. अरविंद पताळे, अनंतपाळ व्हिजन सेंटर डॉ. कुंडलवार एस. एल., प्रा. तुटे व्ही. व्ही., प्रा. जाधव आर.एन., प्रा.गौड एन.एस. वाकूर प्रा. वाकडे एन.डी., प्रा. वडनेरे एस.एन., डॉ. तपघाळे यु. के. |
| दि.२६-०१-१९ शनिवार | स.९ वा.<br>दु.२ वा.<br>रा.७ वा. | ध्वजारोहण<br>व्याख्यान : राष्ट्रीय एकात्मता. दुग्धसंकलन व व्यवस्थापन. पर्यावरण संवर्धन. एड्स निर्मुलन. आयुर्वेदाचे महत्व. वनऔषधीचे महत्व. व्यसनमुक्ती. | प्रा. अंधारे आर. एन., प्रा. खरोबे व्ही.बी., डॉ. लाटे ए. एन., प्रा. कुरे के.व्ही. प्रा. कुमदाळे पी. जी., डॉ. शिंदे जे.यु. प्रा. शिंदे के.यु. |
| दि.२७-०१-१९ रविवार | स.९ वा. | पशुरोग निदान शिबीर<br>काव्य वाचन | डॉ. शेख जी.जी. व सहकारी<br>प्रा. देवदत्त मुंढे, [illegible] |